भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०७/२०१७

**१) अज्ञात चारचाकी वाहनाच्या निष्काळजीपनामुळे पायी जाणाऱ्या इसमास धडक दिल्याने जखमी होवुन औषधोपचार दरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/०७/२०१७ चे २३.३० वा. दर. यातील मृतक अरुण बैरागी रा. अरुण नगर हा पायी जात असतांना यातील अज्ञात आरोपी चारचाकी वाहनाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकास धडक दिल्याने मृतकचे डोक्याला मार लागुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने मर्ग क्र. १६/१७ कलम १७४ जा.फौ. चे तपासात निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल लापरवाहीने चालवुन इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/०७/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी शुभम इंद्रकुमार राऊत वय २३ वर्ष, रा. बेला यांचे वडील इंद्रकुमार बाबुनाथ राऊत वय ४८ वर्ष, रा. बेला हा हातठेला घेवुन रोडने येत असतांना नागपुर कडुन येणाऱ्या आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे वडीलाचे हात ठेल्याला धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन काठीने नाकावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०७/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी रवी पुरुषोत्तम हजारे वय ३२ वर्ष, रा. करचखेडा याला आरोपीतांनी फोन करुन बोलावुन 'तु अंम्बुलन्स चांदणी चौकात का ठेवलास' तु उदया पासुन गाडीवर येवु नकोस असे बोलले असता फिर्यादीने आरोपीस मी १२,०००/—रु. गाडी साठी खर्च केले आहे असे बोलले असता संगनमत करुन आरोपी क्र. १ याने थापड मारली व आरोपी क्र. २ ने काठीने नाकावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) ईलेक्ट्रीक करंट लागल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २३/०७/२०१७ चे १९.१५ वा. दर. यातील मृतक अरुण शालीकराम ढोंबळे वय ३८ वर्ष, रा. राजेदहेगाव हा शेतात पाणी देण्याकरीता शेता लगत नाल्यावर असलेला मोटार पंप घेण्यास गेला असता व मोटार पंप सुरु करीत असतांनी त्याला ईलेक्ट्रीक करंट लागल्याने मृतकास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

५) <u>मोटार वाहन कायदयाखाली कारवाई.</u> :–

दिनांक २४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.